# प्रकरण सातवे

## उपसंहार

अधुनिक महाराष्ट्रात इचलकरंजी शहर हे महाराष्ट्राचे ' मँचेस्टर ' म्हणून ओळखले जाते. इचलकरंजीमध्ये वस्त्रोउद्योग मोठ्या प्रमाणात असून येथे तयार होणारी धोती व साड्या जगभरातील बाजर पेठेत सुप्रसिध्द आहेत. इचलकरंजीचे मँचेस्टर बनविण्याचे श्रेय तेथील संस्थानिक नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांच्याकडे जाते. हा उद्योग नंतर सहकारी संस्थाद्वारे व खाजगी व्यक्तीद्वारे फोफावला.

सन १८९३ - १९९३ या दरम्यानच्या कालावधीमध्ये इचलकरंजी नगर पालिकेने केलेली प्रगती व विस्ताराने मनात अभ्यासाची गोडी निर्माण केली आहे. सन १८९३ मध्ये जेव्हा नगरपालिकेची स्थापना झाली तेव्हा येथे चांगले रस्ते नव्हते, पुरेशा गटारी नव्हत्या, लाईटची सोय नव्हती, कि नागरी प्रशासन नव्हते, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून महाराष्ट्रातील अनेक नगरामध्ये नगर पालिकांनी महत्वाची कामगीरी केली आहे. लोकशाही व राज्यकारभाराचे प्राथमिक धडे प्रथम नगरपालिकेद्वारे प्राप्त होत असतात. बाबासाहेबांनी नगरपालिकेचे महत्व ओळखून राज्यकारभार हाती घेतल्यानंतर लागलीच दुसऱ्या वर्षी म्हणजे १ नोव्हेंबर १८९३ रोजी नगर पालिकेची स्थापना केली. इचलकरंजी शहराच्या विकासामध्ये ही एक महत्वाची घटना घडली की ज्यामुळे शहराच्या विकासाला एक वेगळेच वळण मिळाले. या द्वारे नगराचे विकासास सुरुवात झाली. सन १९९३ मध्ये इचलकरंजी नगरपालिकेला १०० वर्षे पूर्ण होतात, या दरम्यान इचलकरंजी नगरामध्ये ६९९२० मीटर रस्ते, ७,७,७९० र.मि. गटर (भुयारी गटर योजना ) ५२,७३० र.मि. पाणीपुरवठा ,२ दवाखाना, ५६ शाळा याचा समावेश आहे. सन १८९३ ते १९९३ या दरम्यानच्या काळात नगरपालिकेने केलेल्या कार्याचे सिंहावलोकन केले नंतर याची प्रचिती येते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अभ्यासाअंति आपल्याला असे म्हणावे लागेल की इचलकरंजी नगरपालिकेची स्थापना म्हणजे जिल्हातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचा महत्वाचा आदर्श आहे,आणि म्हणून दुस-या प्रकरणामध्ये या संस्थेच्या विकासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. तसेच इचलकरंजी नगरपालिका स्थापनेचा व विकासाचाही थोडक्यात आढावा घेतला आहे. हा विकास प्रामुख्याने ४ मुख्य विभागामध्ये विभागला आहे. या प्रत्येक भागाचे विकासाच्यादृष्टीने एक वेगळे महत्व आहे.नगरपालिका प्रशासनामध्ये या प्रत्येक बदलाचे एक वेगळेच राजकिय महत्व आहे. सुरुवातीला नगरपालिका प्रशासनावर अध्यक्ष म्हणून सरकारी अधिकारी कसा नियुक्त केला जात होता,त्यानंतर १९२७ नंतर लोक प्रतिनिधिना कसे सामावून घेणेत आले ,त्यानंतर १९४४ नंतर लोक नियुक्त प्रतिनिधि मंडळाची कशी निर्मिती होत गेली .पहिले लोक नियुक्त अध्यक्ष व पहिली स्थाई समिती व इतर उपसमित्या कशा स्थापन झाल्या या विषयाचा वृत्तांत दिला आहे.त्यामध्ये स्त्री राखीव, सदस्य संख्या ,मागासवर्गीय लोकाच्यासाठी किती जागा होत्या तसेच नियमाप्रमाणे सदस्य संख्येत कसी वाढ होत गेली या विषयची ही माहिती थोडक्यात दिली आहे.

कोणत्याही नगरपालिकेच्या जीवनात नगरपालिका प्रशासनाला खूप महत्वाचे स्थान आहे. आज प्रत्येक मनुष्याच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनात नियोजन व प्रशासन याला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. आणि म्हणून माझे तिसरे प्रकरण हे नगरपालिका प्रशासनाशी संबंधित आहे.नगरपालिकेने केलेले विकासात्मक कार्य आणि त्याची परिनामकारकता त्यांचा दर्जा या सर्व गोष्टी नगरपालिका प्रशासनाशी संबंधित असतात. इचलकरंजी नगरपालिकेच्या प्रशासनाचा अभ्यास केले नंतर निश्चित ते परिणामकारक व दर्जेदार आहे असे म्हणता येईल कारण नगरपालिकेच्या उत्पन्नावर एक दृष्टीक्षेप टाकला असता ते वाढतच गेले आहे.याचे उत्तम उदाहरण पाणीपट्टी पासून मिळणा-या उत्पन्नाचे देता येईल. सन १९४४ मध्ये पाणी पट्टीमध्ये ३३२७ रु.उत्पन्न मिळाले होते ते वाढत-वाढत जाऊन सन १९९३ मध्ये १९,६०,५०६ इतके झाले नुसते कर गोळा करणे बाबत ही आघाडी आहे असे नाही तर उत्पन्नाच्या इतर क्षेत्रामध्ये सुध्दा नगरपालिकेने

आपल्या वाढत्या उत्पन्नाची झलक दाखविली आहे.जरी कर दात्याला त्यांच्या अपेक्षेप्रमाणे कर देता येत नसला तरी त्यांचा परिनाम मात्र निश्चित आर्थिक अपूरे पणावर होतो, जर लोकाचा दबाव व प्रशासन अपूरे पडले तर नगरपालिका आर्थिक स्थिती खिळखिळी बनेल,आणि नेमके हेच नागरी विकास व प्रशासनातील मुळ अडसर आहेत, आणि म्हणून नगरपालिकेचे व्यवहार करदात्याच्या मनाप्रमाणे असून चालणार नाहीत,नाही तर नगरपालिका लोक कल्याणकारी योजना पूर्णच करु शकणार नाहीत. जरी नगरपालिका प्रशासनावर भ्रष्टाचार प्रलंबित प्रकरणे, किंवा प्रकरणावरील निर्णयात चूका या नगरपालिका प्रशासनाने सुधारता येतील. नगरपालिका,कर्मचारी वर्ग,कर्तव्यदक्ष व तत्पर व कार्यक्षम असेल तर वरील दोषा-रोप पुसून करदात्यांना योग्य न्याय मिळून लोकांना अधिक समाधान लाभेल.

सन १८९३ ते १९९३ या दरम्यानच्या काळातील इचलकरंजी नगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चाचा अभ्यास केला तर नगरपालिकेचे उत्पन्न सतत वाढतच गेलेले दिसून येते आणि याची खात्री आपणा उत्पन्न व खर्चाच्या रक्कमाचे पृथ्करण करुन अभ्यासलेने झाली आहेच,जकात कर ,पाणीपट्टी तसेच इतर कर आणि भाडे या पासून मिळणा-या उत्पन्नात दरवर्षी भरच पडली आहे. त्याच बरोबर सरकारकडून मिळणारे अनुदान व वर्गणी हा एक उत्पन्नाचा महत्वाचा भाग आहेच.

इचलकरंजी नगरपालिका खर्चावर एक दृष्टीक्षेप टाकला तर आपल्याला असे आढळून येते की नगरपालिका नोकरांच्या पगार आणि भत्यावर अधिक खर्च झाला आहे.आणि ही गोष्ट नैसर्गिकच आहे कारण नगरपालिका नियमाप्रमाणे नगर पालिकाना वेगवेगळी लोकोपोयोगी कामे करावी लागतात.लोकांना वेगवेगळ्या सेवा सुविधा पुरवाव्या लागतात.त्याचप्रमाणे वाढत्या लोकसंख्ये बरोबर वाढती घरे, शाळा ,इमारती,दवाखाणे परिनामी नैसर्गिकच नगरपालिका कर्मचा-यामध्ये वाढ करणे भागच आहे आणि त्यामुळे हा वाढता खर्च सहन करावा लागतो.

सन १९९३-९४ मध्ये इचलकरंजी नगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छतेवर एकूण ३१,८५,८१,८९९ रुपये खर्च पैकी ५,२७,९४,५६० रुपये खर्च केले

आहेत .नगरपालिकेने या बाबींवर जाणिवपूर्वक आपले लक्ष केन्द्रित करुन लोकांना अधिक चांगल्या सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. असे म्हणावे लागेल.तसेच त्याच वर्षी शिक्षणावर १,१३,४३,५२९ रु.खर्च करुन नागरीकांना अधिक शैक्षणिक सुविधा पुरविल्या आहेत.आणि या दोन घटकावरील प्रमुख खर्च विचारात घेता नगरपालिकेने केलेल्या कार्याची प्रचिती येईल. या दोन बाबींवर एकूण ३१,८५,८१,८९९ रुपये पैकी ६,४१,३८,०८९ इतका खर्च सन १९९३-९४ मध्ये केलेले दिसून येते.

असे म्हणतात की योग्य व्यवस्थापन व उपलब्ध पैसा आणि त्यांची उपयोजीता लक्षात घेऊन नगरपालिकेने असलेले कार्यक्रम व त्यावरील न्याय खर्च याची सांगड नगरपालिकानी घातली पाहिजे.आणि दुर्दैवाने स्थानिक प्रशासन याची जानीव ठेवलेच असे नाही.स्थानिक राजकारण आणि स्वार्थ यांचे आड येऊन खर्चात कपात होण्या ऐवजी वाढच झालेले दिसून येते,परंतु त्यावर जाणीवपूर्वक विचार करुन निर्णय घेतले तर ते अधिक सुखद झाल्याशिवाय रहाणार नाही.

नगरपालिकेने नवीन उत्पन्नाच्या बाबी द्वारे आपले उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे कारण शासन भविष्यकाळात भरपूर व पूरेसे प्रमाणात निधि उपलब्ध करुन देईलच असे नाही.

इचलकरंजी नगरपालिकेने शिक्षण क्षेत्रात बरीच भरीव प्रगती केली आहे. सन १९६४ पूर्वीचे शिक्षण जिल्हा परिषदेकडे होते. सन १९६४ नंतर नगर पालिकेच्या शिक्षण मंडळाची स्थापना केली.शैक्षणिक कार्यक्रमाचा तौलनीक अभ्यास केला तर जि.प.पेक्षा नगरपालिका शिक्षण मंडळाने ,बरीच भरीव प्रगती केली आहे. मुलींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरविले आहे. तसेच शाळा इमारती बांधून मुलांच्या बसण्याची सोय उत्तम प्रकारे केली आहे.तसेच उर्दू माध्यमातील मुलांच्यासाठी स्वतंत्र उर्दू माध्यमातील शिक्षण देणाऱ्या शाळा काढल्या आहेत.

सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता या विभागाच्या अभ्यासाअंती आपणास असे आढळून येते की इचलकरंजी नगरपालिकेने आपले लक्ष सार्वजनिक आरोग्य

व शहर स्वच्छतेवर केन्द्रित केले होते. सन १९९३-९४ मध्ये एकूण खर्चा पैकी ३१,८५,८१,८९९ या आरोग्य व शहर स्वच्छता विभागावर ५,२७,९४,५६० रुपये खर्च करणेत आले होते.आणि हा खर्च इतर खर्चाच्या मानाने जास्तच होता,याची कारणे ही अपणास असे सांगता येईल की अरोग्य व शहर स्वच्छता या सामान्य मानसाच्या जीवनावर तत्कालीन परिनाम करणारा घटक आहे.शिवाय प्लेग, कॉलरा,देवी कांजण्या यासारखे साथीचे रोग धोपवणे आणि अजार होऊ नये म्हणून रोग प्रतिबंध लस टोचणी करणे तसेच कुटूंब नियोजन व इतर नागरी आरोग्य सेवा योजना कार्यान्वित करणेसाठी खर्चाची तरतुद केली होती.तसेच शहर स्वच्छतेसाठी लागणारे साहित्य उदा.डी.डी.टी.,एच.सी.एल.इ. खरेदी करणे साठी व घरे निर्जंतूक करणेसाठी लागणारे साहित्य व कामगार यांचा पगार भागविणेसाठी बराच खर्च करावा लागला होता.

सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता या विभागाचे मुल्यमापण करणे साठी मृत्यु दर हे एक प्रभावी साधन म्हणून वापरले जाते. इचलकरंजी नगर पालिका रेकॉर्ड वरुन मृत्युदराचे खरे अंकडे मिळू शकत नाहीत कारण इचलकरंजी शहर हे औद्योगिक शहर असेल मुळे कामगाराचे येणे जाणे रहाणे अनिश्चित असते.मंदीच्या वेळी बरेच कामगार स्थलांतरीत होत असतात.शिवाय परगावी राहून कारखाण्यात कामाला येणा-याची संख्या बरीच आहे.शिवाय इतर जवळच्या खेड्यामध्ये दवाखाण्याची सोय नसलेने व नगरपालिका दवाखाण्यात मोफत औषधोपचाराची सोय करत असलेने बरेच लोक उपचार घेत असतात. त्यामुळे निश्चित असा मृत्युदर सांगता येत नाही. तरीही नगरपालिका रेकॉर्डचा अभ्यास करता या विभागाने केलेले काम समाधानकारक आहे.

इचलकरंजी नगरपालिकेने वरील कार्यक्रम यशस्वीपणे राबवून सन १८५३ ते १९९३ अखेर इचलकरंजी नगरपालिकेने योग्य संतुलीत विकास साधला आहे की जो इचलकरंजी शहरासाठी मानाचा मुंकूट मणी ठरला आहे.सातवाड्याचे इचलकरंजी गाव आज महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणून ओळखले जात आहे.

इचलकरंजी नगरपालिका आज --

इचलकरंजी नगरपालिकेने आज जवळ जवळ सर्व नागरी समस्याना यशस्वी तोंड दिले आहे व नागरीकाना शक्यतो सर्व सुविधा पुरविल्या आहेत. परंतु इचलकरंजी हे दिवसेदिवस फार मोठया प्रमाणात वाढत असल्याने नगरपालिकेने पुरविलेल्या सुविधा अपूऱ्या पडत आहेत. नवीन उपनगरामध्ये अजूनही पाण्याचा प्रश्न भेडसावतो आहे,मुलांना शाळेच्या सोई अपूऱ्या पडत आहेत ,रस्ते करणे गरजेचे आहे तसेच गटारी बांधणे गरजेचे आहे.या शहरामध्ये कापड उद्योग प्रक्रिया असल्यामुळे रसायण मिश्रित पाणी,वायू प्रदुषण इत्यादि गोष्टींना नागरिकांना तोंड द्यावे लागते आहे.

सुदैवाने केन्द्रिय सरकारने आपले लक्ष इकडे केन्द्रित केले आहे.७ जुलै १९८९ मध्ये मुख्यमंत्र्याची बैठक बोलाविण्यात आली होती,यामध्ये सर्व स्थानिक नागरी समित्याच्या निवडणूका निवडणूक आयोगाकडून घेणेत याव्यात व त्याची आर्थिक बाजू,मजबुत होणे साठी उपाय योजना करणेचे ठरले होते, भारताचे माजी पंतप्रधान कै.राजीव गांधी यांनी स्थानिक नागरी समित्याना आपली आर्थिक बाजू भक्कम करणेसाठी व समस्याचे निराकरण करणेसाठी आधिक अधिकाराची गरज आहे.तसेच राज्य शासन व केन्द्र शासनाने ही यांना अधिक अर्थ सहाय्य केले पाहिजे ( दैनिक डेक्कण हेरॉल्ड दि.८-७-१९८९ ) असे म्हटले होते.नगरपालिका प्रशासन अधिक प्रभावी होणेसाठी बुध्दीजीवी वर्गाने पुढाकार घेतला पाहिजे, स्थानिक समित्यामध्ये रस घेऊन विकासात्मक वाटचाल केली पाहिजे,स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक लॉर्ड रिपणने ही आपली अशीच इच्छा व्यक्त केलो होती त्यांनी आपल्या ` व्हॉट आय वॉन्ट ` या ग्रंथात लिहिले होते की,` बुध्दीजीवी वर्गाने आपल्या स्थानिक विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सहभागी होऊन विकास करुन घेतला पाहिजे.` पण दुर्दैवाने आज अनभिज्ञ व अशिक्षित लोकच सामान्यता या क्षेत्रात उतरलेचे दिसून येतं. आणि त्यामुळे नगरपालिकाचा व्हावा तेवढा विकास झालेचे दिसून येत नाही.तसेच भ्रष्टाचार,पक्षापातीपणा,अनिर्णय किंवा पुलबी प्रकरण इत्यादि समस्यांना तोंड द्यावे लागते.तसेच आर्थिक प्रश्न ही आहेत.

वरील सर्व समस्याचे निराकरण होणे गरजेचे आहे. बुश म्हणतो की ' स्वयंम शासित सरकार हे चांगल्या शासनापेक्षा कधी ही चांगलेच असते.'.